राज्यातील सर्व पशुवैद्यकीय चिकित्सालये, तालुका पशुवैद्यकीय चिकित्सालये, जिल्हा पशुवैद्यकीय चिकित्सालये व फिरते दवाखाने यांच्या कामकाजाच्या वेळा निश्चित करणेबाबत.....

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक.** DAHD-११०११/१५५/२०२५-DAHD-AH-१ (१२५२६९७)
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**
**दिनांक:- २८ फेब्रुवारी, २०२६.**

**वाचा** :- १. आयुक्त पशुसंवर्धन यांचे परिपत्रक क्र. एडीएम-६(२२)/५६६/४१७८-४४५७/ ९६/ पसं-११, दि.२०.०६.१९९६.
२. शासन पत्र क्र.पसंप्र-२०२०/प्र.क्र.२५५/पदुम-१, दि.४.१.२०२१.
३. आयुक्त पशुसंवर्धन यांचे जा.क्र.प्रशासन-१/प्र.क्र१२१/८३१/२०२५/पस८, पुणे-६७, दि.१४.०८.२०२५.

**प्रस्तावना :-**

पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाकडून कृत्रिम रेतन, कृत्रिम रेतनाव्दारे जन्मलेली वासरे, गर्भधारणा तपासणी, वंध्यत्व निवारण उपचार, लसीकरण, औषधोपचार व शस्त्रक्रिया यासारख्या तांत्रिक सेवा पुरवण्यात येतात. सन २०२०-२१ ते सन २०२४-२५ या कालावधीतील खालील आकडेवारीचे अवलोकन केले असता वरील प्रत्येक परिमाणात मोठया प्रमाणात घट झाली असल्याचे स्पष्ट होत आहे.

| वर्ष | कृत्रिम रेतन | कृत्रिम रेतनाव्दारे जन्मलेली वासरे, | गर्भधारणा तपासणी | वंध्यत्व निवारण उपचार | लसीकरण | औषधोपचार | शस्त्रक्रिया |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०२०-२१ | २१०१८०६ | ७८६८७१ | २६१७२२८ | १०५४३८२ | ४८४९०१०२ | १५४७९५८५ | ४६९०८४ |
| २०२१-२२ | १८६४९०० | ७०६७९८ | २३९३००९ | ९९२४१२ | ३२१२२४३८ | १४२५१८०४ | ४२१४९२ |
| २०२२-२३ | १६३४६३० | ६०९६१० | १८९०६९२ | ६९९७०२ | ५१६३०९७० | ११५११६७३ | २४९६९१ |
| २०२३-२४ | १६८८७४९ | ५७०५३३ | १९९६५९० | ९८७०६६ | ५६४८७५५० | ९३२९१९९ | १९५६५३ |
| २०२४-२५ | १७३०७९० | ५८९५९१ | २११२९०६ | ८७८५४९ | ८५८९६४४६ | १४१८५४१३ | १९९००१ |

२. वरील विवरणपत्राचे अवलोकन केले असता, सन २०२०-२१ ते २०२४-२५ या कालावधीत कृत्रिम रेतनमध्ये १७.६५ टक्के, कृत्रिम रेतनाव्दारे जन्मलेली वासरे यामध्ये २५.०७ टक्के, गर्भधारणा तपासणी यामध्ये १९.२६ टक्के, वंध्यत्व निवारण उपचार यामध्ये १६.६७ टक्के, औषधोपचार यामध्ये ८.३६ टक्के व शस्त्रक्रिया यामध्ये ५७.५८ टक्के इतकी घट झाली आहे.

३. सन २०२४-२५ च्या आर्थिक पाहणी अहवालानुसार पशुजन्य उत्पादनाचा राज्याच्या अर्थव्यवस्थेत फक्त २.८ टक्के इतका वाटा आहे. महाराष्ट्र राज्य आर्थिक सल्लागार परिषदेचे अहवालामध्ये राज्याच्या अर्थव्यस्थेत पशुसंवर्धन व्यवसायामार्फत भर टाकण्यास खूप वाव आहे, असे नमूद केले आहे. इतर राज्याच्या तुलनेत राज्यातील पशुधनाची उत्पादन क्षमता कमी आहे. तथापि उपरोक्त वस्तुस्थिती अत्यंत निराशाजनक आहे. यामागची कारणमिमांसा विचारात घेतली असता, प्रामुख्याने दवाखान्यांच्या कामकाजाच्या वेळेत करण्यात आलेला बदल असल्याचे निर्देशनास आले आहे. गुजरात, आंध्रप्रदेश, उत्तरप्रदेश, छत्तीसगड या राज्यांमधील दवाखान्यांच्या वेळेचा विचार करता राज्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या कार्यालयीन कामाजाची वेळ पुर्ववत करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

४. राज्याच्या पशुजन्य उत्पादनात वाढ घडवून आणण्यासाठी पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाची वाटचाल पशुउद्योजकतेकडे करणे आवश्यक असून त्या माध्यमातून रोजगार निर्मिती व स्वयंरोजगार निर्माण करणे आवश्यक आहे. त्यासाठी पशुवैद्यकीय संस्थांच्या कार्यक्षेत्रातील गावांमधील शेतकरी, पशुपालक व नागरिकांना पशुसंवर्धन व दुग्धव्यवसायाशी संबंधित व निगडीत योजनांची व कार्यक्रमांची माहिती देणे, प्रसिध्दी करणे व सर्व भागधारकांपर्यंत योजना व कार्यक्रम पोहचविणे आवश्यक आहे. योजना व कार्यक्रमांच्या माध्यमातून पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय क्षेत्रात रोजगारनिर्मिती व स्वयंरोजगारास प्रोत्साहन देण्याचे शासनाचे धोरण आहे. ज्यायोगे शासनाच्या विविध योजना व कार्यक्रमांच्या माध्यमातून पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय क्षेत्रात उद्योजकता निर्माण करुन शेतकरी व पशुपालकांचे उत्पन्न वाढविण्याचे उद्दिष्ट साध्य होईल. यासाठी राज्यातील पशुधनास पशुवैद्यकीय दवाखाने/ चिकित्सालयांच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या पशुवैद्यकीय सेवा वेळेत उपलब्ध होणे आवश्यक ठरते. या पार्श्वभुमीवर पशुवैद्यकीय संस्थाच्या कामकाजाच्या वेळा निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय:-</u>**

५. पशुसंवर्धन विभागांतर्गत विविध पशुवैद्यकीय संस्था कार्यरत असून त्यांच्या कार्यालयीन कामकाजाच्या वेळा संदर्भाधीन क्र.१ येथील परिपत्रकान्वये निश्चित करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये राज्यातील सर्व पशुवैद्यकीय दवाखाने, तालुका पशुसर्वचिकित्सालय, जिल्हा पशुचिकित्सालय व फिरते दवाखाने यांच्या कार्यालयीन वेळेमध्ये संदर्भाधीन क्र.२ येथील पत्रान्वये बदल करण्यात आला होता. तथापि ग्रामीण भागातील पशुपालकांना सकाळच्या सत्रामध्ये पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून तसेच कार्यक्षेत्रातील गावांमध्ये भेटी देणे व पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विषयक विविध योजना कार्यक्षेत्रात पोहचविण्याच्या अनुषंगाने राज्यातील जिल्हा पशुवैद्यकीय चिकित्सालय, तालुका पशुवैद्यकीय चिकित्सालय व पशुवैद्यकीय दवाखाने/चिकित्सालये या संस्थांच्या कार्यालयीन कामकाजाच्या वेळेसंदर्भात आयुक्त पशुसंवर्धन यांचे परिपत्रक क्र. एडीएम-६(२२)/५६६/४१७८-४४५७/९६/पसं-११, दि.२०.०६.१९९६ व शासन पत्र क्र.पसंप्र-२०२०/ प्र.क्र.२५५/ पदुम-१,दि.४.१.२०२१ व त्याअनुषंगाने आयुक्त पशुसंवर्धन यांनी निर्गमित केलेले सर्व आदेश/ परिपत्रके रद्द करुन पुढील प्रमाणे कार्यालयीन कामकाजाच्या वेळा निश्चित करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे :-

| जिल्हा पशुवैद्यकीय चिकित्सालये व तालुका पशुवैद्यकीय चिकित्सालये, पशुवैद्यकिय चिकित्सालये, फिरते पशुवैद्यकिय चिकित्सालये यांच्या कामकाजाच्या सुधारित वेळा | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | वार | वेळ | |
| १. | सोमवार ते शुक्रवार | सकाळी ८.०० ते १.३० | सायं. ३.०० ते ५.०० |
| २. | शनिवार | सकाळी ८.०० ते १.०० | --- |
| जिल्हा स्तरावरील व तालुका स्तरावर विशेषज्ञ सेवा तसेच पशुपालकांना आकस्मिक प्रसंगी २४ तास पशुवैद्यकिय सेवा उपलब्ध राहणार आहे. | | | |

६. वरील कार्यालयीन वेळेत खालील सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी :-

१) विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या संस्थामध्ये विशेषज्ञ सेवा व संबंधित जिल्हा व तालुक्यातील संदर्भ पशुरुग्ण यांची तपासणी व उपचाराचे नियमित कामकाज असल्याने वरील कार्यालयीन वेळेव्यतिरिक्त आकस्मिक प्रसंगी पशुपालकांना २४ तास पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची / संस्थाप्रमुखाची राहील.

२) त्याव्यतिरिक्त दुपारच्या मधल्या सत्रात दर्शविलेल्या वेळेमध्ये दवाखान्याच्या कार्यक्षेत्रातील गावांमध्ये योजनांविषयक प्रचार, प्रसिध्दी, प्रशिक्षण, मार्गदर्शन तसेच तांत्रिक कामकाज करावे.

३) संबंधित पशुवैद्यकीय दवाखाना/चिकित्सालयांच्या कार्यालय प्रमुख व कर्मचाऱ्यांनी कार्यक्षेत्रातील प्रत्येक गावात ७ दिवसांतून किमान एक वेळ भेट द्यावी.

४) संबंधित दवाखान्यातील अधिकारी कार्यक्षेत्रातील गावांमध्ये भेटीसाठी जाण्यापुर्वी त्याबाबतची सूचना व संबंधित अधिकाऱ्याचा भ्रमणध्वनी क्रमांक दवाखान्याच्या दर्शनी भागावर लावण्यात यावा.

५) पशुवैद्यकीय दवाखान्यातील अधिकारी कर्मचारी यांनी कार्यक्षेत्रातील गावामधील ग्रामसभेला उपस्थित राहणे व त्यामध्ये पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाच्या योजनांची माहिती ग्रामस्थांना बंधनकारक राहील.

६) पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाच्या विविध योजना, त्याची कार्यपध्दती यासंदर्भात निर्गमित होणारे शासन निर्णय, परिपत्रके, सूचना इ. कार्यक्षेत्रातील संबंधित ग्रामपंचायतींना उपलब्ध करुन देऊन ग्रामसभेत वाचन करणे व योजना शेतकरी व पशुपालकांपर्यंत पोहचविणे.

७) गावभेटीसंदर्भात केलेल्या कामकाजाची नोंद नोंदवहीमध्ये /ऑनलाईन प्रणालीवर करण्यात यावी व आठवड्याला त्याचा अहवाल जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालयामार्फत आयुक्त पशुसंवर्धन यांना सादर करावा.

८) वरील कार्यालयीन कामकाजांच्या वेळांचे तंतोतंत पालन करण्याची दक्षता संबंधित कार्यालयात कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांनी घ्यावी. यासाठी सर्व अधिकारी/ कर्मचारी

यांनी शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या बायोमेट्रीक प्रणालीवर उपस्थितीची नोंद करणे बंधनकारक राहील.

९) कार्यालयात विलंबाने उपस्थित राहणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्या कार्यालयीन उपस्थितीबाबत संबंधित कार्यालय प्रमुख यांनी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांना मासिक अहवाल सादर करावा. आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यानी नियमितरित्या विलंबाने उपस्थित राहणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द कारवाई करुन त्याबाबतचा मासिक अहवाल शासनास सादर करावा.

७. सदर आदेश तात्काळ प्रभावाने लागू करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०२२८१७५४२८५५०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MARALE NIWRUTTI BHAGUJI

Digitally signed by MARALE NIWRUTTI BHAGUJI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept,
2.5.4.20=8A75C414FF50CE35220C63CD53D2EB1A99A474C02300BEEA74BB051C4C3C90A9, postalCode=400032,
st=Maharashtra,
serialNumber=5C891DA87D2A4842558454524CC114BA5B2F67A2A80796592830D345500F15CC, cn=MARALE NIWRUTTI BHAGUJI
Date: 2026.02.28 17:55:26 +05'30'

**( नि.भा.मराळे)**
**उपसचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद.
३. मा. मंत्री (पशुसंवर्धन) यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.
४. सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय) औंध, पुणे
५. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, मुंबई/नाशिक/नागपूर/पुणे/लातूर/औरंगाबाद/अमरावती.
६. सहआयुक्त पशुसंवर्धन, रोग अन्वेषण विभाग, पुणे.
७. सहआयुक्त पशुसंवर्धन, पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था
८. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, सर्व जिल्हे.
९. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व जिल्हे.
१०. कार्यासन पदुम-१ (निवड नस्ती).